स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि. २३/०६/२०२६

***मा.महापौर महोदयांच्या हस्ते महानगरपालिका मुख्यालयातील आपत्ती व्यवस्थापन केंद्र व उपहारगृहाचे उद्‍घाटन***

वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयातील अत्याधुनिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र तसेच उपहारगृहाचे उद्‍घाटन आज दिनांक २२ जुन, २०२६ रोजी मा.महापौर श्री.अजीव पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

पावसाळ्यात अतिवृष्टी, पूर, वादळ, आग लागणे तसेच इतर आपत्कालीन परिस्थितींमध्ये नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी व तात्काळ प्रतिसाद यंत्रणा असावी या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत मनपा मुख्यालयात आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रात महानगरपालिकेसोबतच इतर विभागाचे प्रतिनिधी कार्यरत असणार आहेत. सदर आपत्ती व्यवस्थापन केंद्र नागरिकांच्या सोयीसाठी २४x७ कार्यरत राहणार असून आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या १८००२६७३८९८ व १८००२३३४३५३ या टोल फ्री हेल्पलाईन क्रमांकांवर तसेच ७०५८९१११२५ या संपर्क क्रमांकावर नागरिकांना आपत्कालीन परिस्थितींमध्ये संपर्क साधता येईल. नागरिकांच्या प्राप्त समस्यांची तात्काळ दखल घेण्यात येऊन संबंधित विभागामार्फत त्या समस्येवर तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. यावेळी मा.महापौर महोदयांसह उपस्थित मान्यवरांनी आपत्ती व्यवस्थापन केंद्राची पाहणी करून केंद्रातील उपलब्ध सुविधा, तांत्रिक यंत्रणा व आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत पोहोचविण्यासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेची माहिती घेतली. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व आपत्तीच्या काळात प्रभावी समन्वय साधण्यासाठी हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

त्यानंतर महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुविधेसाठी सुरू करण्यात आलेल्या उपहारगृहाचे उद्‍घाटन मा.महापौर महोदयांच्या हस्ते करण्यात आले. या उपहारगृहामुळे अधिकारी, कर्मचारी तसेच महानगरपालिकेत येणाऱ्या नागरिकांना स्वच्छ, दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध होणार आहेत.

या कार्यक्रमास मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.), मा.स्थायी समिती सभापती श्री.प्रवीण शेट्टी, मा.सभागृह नेते श्री.प्रफुल्ल साने,

मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, सन्माननीय नगरसेवक-नगरसेविका, अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, उप-आयुक्त श्री.अजित मुठे, उप-आयुक्त श्रीम.हर्षला राणे, प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.रोहन मोरे, पत्रकार, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.